|| सा विद्या या विमुक्तये ||

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णूपुरी, नांदेड-४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)

Establishment on 17th September 1994 -Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade

| Phone : (02462) 215246<br>Fax : (02462) 215572 | MEETING & ELECTION SECTION | Website :www.srtmun.ac.in<br>E-mail : election@srtmun.ac.in |
|---|---|---|


## निवडणूक सूचना

संदर्भ: Notification No. 03 SRTMUN/Election/2022-2023/304 dated 16/09/2022

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम 28(2)(t) मधील तरतुदीनुसार अधिसभेवर कलम १३१ मध्ये तरतुद केल्यानुसार स्थापित करण्यात आलेल्या निर्वाचक गणाने निवडून दयावयाचे विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरापैकी महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २८ एप्रिल, २०१७ अन्वये प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठीच्या विहीत केलेल्या पात्रताशर्ती पूर्ण करणारे दहा सदस्य निवडून द्यावयाचे आहेत.

तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम 28(2) या पोटकलमातील तरतुदीनुसार निवडून द्यावयाचे नोंदणीकृत पदवीधर हे अध्यापक (नियमित असलेले किंवा कंत्राटी तत्वावर घेतलेले—मग त्यांचा अध्यापकीय अनुभव काहीही असो), प्राचार्य, विभागप्रमुख, व्यवस्थापन किंवा या पोट—कलमामध्ये नमूद केलेल्या इतर कोणत्याही प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या पदवीधरांचा समावेश होणार नाही.

मतदान एकल संक्रमणिय पसंतीक्रम (Single Transferable vote) पध्दतीनुसार व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार—ब, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे दिनांक १७ मे, २०१७ च्या अधिसुचनेत नमुद एकरूप परिनियम क्रमांक १ नुसार दिलेल्या तरतुदीप्रमाणे निश्चित केलेल्या मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. निवडून द्यावयाच्या जागांची विभागणी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | प्रवर्ग | प्रतिनिधींच्या निवडून द्यावयाच्या जागा |
|---|---|---|
| ०१. | खुला (Open) | ०५ (पाच) |
| ०२ | महिला (Woman) | ०१ (एक) |
| ०३ | अनुसुचित जाती (S.C.) | ०१ (एक) |
| ०४ | अनुसुचित जमाती (S.T.) | ०१ (एक) |
| ०५ | निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती (DNT(VJ)/NT) | ०१ (एक) |
| ०६ | इतर मागास वर्ग (OBC) | ०१ (एक) |
| | **एकूण** | **१०(दहा)** |

मतदार संघातील प्रत्येक प्रवर्गासाठी मतपत्रिका वेगवेगळी असेल. मतदान सामायिक (in common) असेल. नोंदणीकृत पदवीधरांच्या अंतिम मतदारयादी प्रमाणे या निवडणूका घेण्यात येत आहेत. या मतदार यादीत समाविष्ट असलेल्या मतदारांनाच निवडणुकीत भाग घेता येईल.

**परिनियमातील तरतुदीनुसार व वरील संदर्भिय अधिसूचनेतील दि. ११/१०/२०२२ पर्यंत पुर्ण झालेल्या प्रक्रिया कायम ठेवून निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.**

| अ.क्र | विवरण | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| ०१. | नामनिर्देशन पत्र भरण्याचा दिनांक व वेळ | दिनांक १३ ऑक्टोबर ते<br>दिनांक १७ ऑक्टोबर २०२२,<br>सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत<br>(कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी) |
| ०२. | नामनिर्देशन पत्र छाननीचा दिनांक | दिनांक १८ ऑक्टोबर ते<br>१९ ऑक्टोबर, २०२२ |
| ०३. | वैध व अवैध नामनिर्देशनपत्र यादी प्रसिध्द करणे | दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ |
| ०४. | मा. कुलगुरू महोदयांकडे नामनिर्देशनपत्रा संदर्भातील अपील सादर करणे | दिनांक २१ ऑक्टोबर ते<br>२२ ऑक्टोबर, २०२२<br>सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत<br>(कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी) |
| ०५. | मा. कुलगुरू महोदयांचा अपीलावरील निर्णय | २९ ऑक्टोबर, २०२२ |
| ०६ | नामनिर्देशन पत्र परत घेण्याचा दिनांक व वेळ | दिनांक ३१ ऑक्टोबर ते<br>दिनांक ०२ नोव्हेंबर २०२२,<br>सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत<br>(कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी) |
| ०७ | निवडणूकीसाठी पात्र उमेदवाराची यादी जाहीर करणे | दिनांक ०३ नोव्हेंबर २०२२ |
| ०८ | मतदानाचा दिनांक व वेळ | **रविवार, दिनांक १३ नोव्हेंबर २०२२**<br>सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत |
| ०९ | मतमोजणी व निकालाचा दिनांक व वेळ | **बुधवार, दिनांक १६ नोव्हेंबर २०२२**<br>सकाळी १०.०० पासून |

महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २८ एप्रिल, २०१७ अन्वये अधिसभेवर दहा नोंदणीकृत पदवीधर निवडून देण्यासाठी विहित केलेल्या पात्रता शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| (a) | Elected by the Collegium of Registered graduates -<br>Has graduated at least 5 years prior to the date of nomination,<br>Shall not include graduates falling in or covered by the category of Teachers (regular or on contract basis irrespective of their teaching experience), Principals, Heads of the Departments, Management or any other categories mentioned in the Section 28(2). |
| क. | नोंदणीकृत पदवीधर गटाने निवडून दिलेले —<br>नामनिर्देशनाच्या दिनांकापूर्वी किमान पाच वर्ष आधी पदवीधर झालेला असावा. यामध्ये अध्यापक (नियमित किंवा कंत्राटी तत्वावरील अध्यापकांचा मग अध्यापकीय अनुभव काहीही असो), प्राचार्य, विभागप्रमुख, व्यवस्थापन किंवा कलम २८(२) मध्ये अंतर्भूत असणाऱ्या इतर कोणत्याही प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या पदवीधरांचा समावेश होणार नाही. |

वरील पात्रता शर्तीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कागदपत्रे नामनिर्देशन पत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.

1. Attested copy of first degree certificate.

नामनिर्देशनपत्र (नॉमिनेशन फॉर्म) विद्यापीठाच्या लेखा विभागात रु. १०/— भरुन विद्यापीठातील सभा व निवडणूक विभागातून कार्यालयीन वेळेत व कामाकाजाच्या दिवशी मिळू शकेल.

.३.

नामनिर्देशनपत्र विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर Link-Election Portal-2022 वर उपलब्ध असून सदर अर्ज डाऊनलोड करून घेता येईल तथापि, याबाबतचे शुल्क रुपये १०/— विद्यापीठाच्या लेखा विभागात भरणा करून त्याची पावती नामनिर्देशन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे तसेच नामनिर्देशन पत्रासोबत, विहीत नमुन्यातील हमीपत्र जोडणे आवश्यक आहे.

महिला मतदार संघ वगळता इतर राखीव प्रवर्गाच्या जागासाठी नामनिर्देशन पत्र सादर करताना सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमीत केलेल्या मूळ जातीच्या प्रमाणपत्राची स्वसाक्षांकित केलेली सत्य प्रत जोडावी.

* योग्य रीतीने परिपूर्ण भरलेले व वेळेपूर्वी दाखल केलेले नामनिर्देशन अर्ज विचारात घेतले जातील.
* उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर जर वैध नामनिर्देशनाची संख्या, भरावयाच्या रिक्त पदांच्या संख्येपेक्षा अधिक नसेल तर निवडणुकीचा निकाल जाहीर करण्याच्या दिनांकास नामनिर्देशीत केलेल्या उमेदवारांना निवडून आल्याचे घोषित करण्यात येईल.
* उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार असतील, तर अशा उमेदवारांची अंतिम यादी (Valid Nominations) जाहीर करण्यात येईल. सदर जागांची निवडणूक **रविवार, दिनांक १३ नोव्हेंबर २०२२** रोजी सकाळी ८.०० ते ५.०० या वेळेत निश्चित केलेल्या महाविद्यालयातील मतदान केंद्रावर घेण्यात येईल. मतदाराने मतदान कुठे करावयाचे आहे, याची माहिती विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर Link-Election Portal-2022 वर प्रसिध्द करण्यात आली आहे.

नामनिर्देशन पत्राची छाननी, मतमोजणी व निवडणूक निकाल विद्यापीठाने निश्चित केलेल्या तारखेस व वेळी होईल. मतमोजणीच्या वेळी उमेदवार किंवा त्यांनी लेखी पत्राद्वारे योग्य पध्दतीने प्राधिकृत करण्यात आलेली अंतिम मतदार यादीतील अधिकृत केलेला त्याचा प्रतिनिधी हजर राहू शकेल.

उमेदवारास उमेदवारी मागे घ्यावयाची असल्यास उमेदवारास निवडणुकीच्या वेळापत्रकात विहित केलेल्या दिनांकास सायंकाळी ५.०० वाजण्यापूर्वी विद्यापीठाच्या सभा व निवडणूक विभागात व्यक्तिशः किंवा त्याने लिखित स्वरुपात प्राधिकृत केलेल्या यक्तीमार्फत त्याने स्वाक्षरीत केलेला नामनिर्देशन मागे घेतल्याचा विहित नमुन्यातील (Withdrawal form) अर्ज सादर करावा लागेल.

उमेदवाराने आपल्या सहीनिशी उमेदवारी परत घेण्यासंबंधीचा अर्ज कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांना करणे अनिवार्य आहे. सदरील अर्जावरील उमेदवाराची सही व महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा मान्यता परिसंस्थाचे संचालक किंवा विद्यापीठातील शैक्षणिक संकुलाचे संचालक यापैकी एकाने साक्षांकित केलेली असावी, अन्यथा उमेदवारी परत घेण्यासंबंधीच्या अर्जावर विचार केला जाणार नाही.

अंतिम मतदार यादी प्रत्येक जिल्हासाठी रुपये ३००/— सर्व जिल्हांची एकत्रीत मतदारयादी रुपये ८००/— व पेन ड्राईव्ह मध्ये मतदार यादी पाहिजे असल्यास रुपये ४००/— विद्यापीठाच्या लेखा विभागात भरुन विद्यापीठाच्या सभा व निवडणूक विभागातून प्राप्त करता येईल. मतदाराने मतदानासाठी जाताना स्वतः बरोबर आधार कार्ड/पॅनकार्ड, निवडणूक आयोगाने दिलेले ओळखपत्र, पारपत्र, वाहन चालविण्याचा फोटो असलेला परवाना किंवा सेवेत कार्यरत असल्यास नियोक्त्याचे ओळखपत्र या पैकी एक आणावे.

वरील पैकी एक ओळखी बाबत पुरावा मतदान केंद्रावर निवडणूक अधिकाऱ्यांना दाखविल्याशिवाय मतपत्रिका मिळणार नाही.

जा.क्रं.स्वारातीमवि/निवडणूक/अधिसभा/नों.पदवीधर/२०२२—२३/410
दिनांक : १२/१०/२०२२

कुलसचिव
तथा निवडणूक निर्णय अधिकारी

Estd. 17Sep.94 Nanded